नोंदणीकृत डाकेने


## राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद

बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

दुरध्वनी क्रमांक-०२४०-२३५२५४४/२३५२१३३ फॅक्स क्र.०२४०-२३५२५४४

आयोगाचा संकेतस्थळ :-www.sic.maharashtra.gov.in


---

जा.क्र.२०१६/रामाआ/संकीर्ण /प्र.क्र.३९/आस्था 5487

दिनांक : २५ ऑक्टोबर,२०१६

**परिपत्रक :**

माहिती अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत माहिती मागविण्याऱ्या अर्जदारांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रकाद्वारे संबंधित विभागांना सुचित केलेले आहे. तथापि, शासन परिपत्रकानुसार विहित मुदतीत व विहित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही संबंधित सार्वजनीक प्राधिकरणामार्फत पुर्ण करण्यात येत नाहीत. सबब राज्य माहिती आयोगाकडे मोठया प्रमाणावर व्दितीय अपील दाखल होत आहेत.

माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने विभागवार राज्य माहिती आयुक्त कार्यालये स्थापन केलेली आहेत. राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद कार्यालयाकडे मराठवाडयातील आठ जिल्हयातील राज्य शासनांतर्गत कार्यालयाशी संबंधित व्दितिय अपीलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्याची कार्यवाही करण्यात येते.

आयोगाकडे होणाऱ्या सुनावणीस उपस्थित राहतांना संबंधित माहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी आयोगाच्या सुनावणी नोटीसमधील सूचानांचे पालन न करता अपूर्ण माहिती,माहिती देण्यास झालेल्या विलंबाचा खुलासा,विहित मुदतीत प्रथम अपिलावर सुनावणी न घेणे, आयोगास लेखी न कळविता सुनावणीस अनुपस्थित राहणे अशा बाबी मोठया प्रमाणावर दिसून येत असल्याने मा. राज्य माहिती आयुक्त यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे.

राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे मोठया प्रमाणात प्राप्त होणारे व्दितीय अपील अर्ज किंवा कलम १८ नुसार प्राप्त होणाऱ्या तक्रारी यांचेवर प्रभावी नियंत्रणासाठी खालील नमूद सुचना संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना देण्यात येऊन त्यांचे अनुपालन अयोगास सादर करण्यात यावे.

१) आयोगच्या व्दितीय अपीलावरील सुनावणी नोटीसमधील सुचना व आयोगाने संकेतस्थळावर (www.sic.maharashtra.gov.in) उपलब्ध केलेला सुनावणीचा तारिखनिहाय तपशील याबाबत जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी गांभिर्यपुर्वक नोंद घेणे आवश्यक आहे.

२) आयोगाकडील सुनावणीस कोणत्याही लेखी पत्राशिवाय जन माहिती अधिकारी/प्रथम

अपिलीय अधिकारी यांनी अनुपस्थित राहू नये

३) आयोगाकडे सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आपले म्हणने लेखी स्वरुपात सादर करणे आवश्यक आहे

४) आयोगाकडे अथवा अपिलार्थीस पत्रव्यवहार करतांना त्यावर संबंधिताची स्वाक्षरी, नाव, पदनाम व कार्यालयाचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक,ई-मेल आयडी असावा.

५) अपवादात्मक परिस्थितीत सुनावणीस उपस्थित राहता येऊ शकत नसल्यास प्राधिकृत प्रतिनिधी पाठविता येईल. तथापि त्यास त्या प्रकरणाची पुरेशी माहिती असणे आवश्यक राहील.

६) खुलाश्यात ज्या अधिकारी/कर्मचारी यांचेमुळे माहिती देण्यास विलंब झाला त्याचे नांव व पदनाम याचा स्पष्ट उल्लेख असावा.

७) जी पत्रे कोणत्याही नांव, पदनाम व कार्यालाचा पुर्ण पत्ता, दुरध्वनी क्रमांकाशिवाय करण्यात येतील अशा पत्रव्यवहारास आयोग अधिकृत समजणार नाही. बहुतेक विभागाच्या कार्यालयाकडून **करिता** म्हणून स्वाक्षरी करुन पत्रव्यवहार केला जातो. अशावेळी पत्रावर स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तिचे नांव व पदनाम असणे गरजेचे असल्याने अशा स्वरुपाचा पत्रव्यवहार आयोगाकडे करण्यात येऊ नये.

८) शासन परिपत्रक क्र. संकिर्ण -२०१५/प्र.क्र.(२३६/१५) सहा, दि.१९/१२/२०१५ मधील विहित कार्यपध्दतीचे पालन व्हावे. माहिती उपलब्ध करुन देतांना ती माहिती अधिकारात दिल्याचा त्यावर विहित केलेला शिक्का असावा.

उक्त नमुद सुचना आपल्या अधिपत्याखालील जिल्हयातील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.

(मा.राज्य माहिती आयुक्त यांच्या मान्यतेने)

द.रा.कहार

(द. रा. कहार)

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रति,

१. आयुक्त, विभागीय आयुक्त (महसूल), औरंगाबाद.जिल्हा औरंगाबाद

२. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद/ जालना/ परभणी/ लातूर/ उस्मानाबाद/ बीड/ हिंगोली/ नांदेड.

३. निवडनस्ती आस्था